अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक
कारागृह व सुधारसेवा
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
दुरध्वनी: क्र.०२०/२६१२३५६३
फॅक्स नंबर ०२०/२६१२५८७८

अत्यंत महत्वाचे

जा.क्र.न्यावि/राज्यमाफी/ 4432 /२०१७ कक्ष-९(८) पुणे-१ दि. 5/०६/२०१७

विषयः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त बंद्यांना राज्यमाफी देणेबाबत.

संदर्भः- शासन निर्णय क्र. संकीर्ण०९१६/प्र.क्र.२५०/१६ तुरुंग-३ दि.३ जून,२०१७

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त(समता वर्ष) राज्यातील विविध कारागृहामध्ये शिक्षा भोगत असणा-या बंद्यांना शासनामार्फत राज्यमाफी देण्याबाबत नमुद केलेल्या वर्गात मोडणा-या बंद्यांना त्यांच्या शिक्षेत (दंडाची शिक्षा वगळून) नमुद केल्यानुसार राज्यमाफी देण्याचे आदेश झाले आहेत.

उक्त आदेशामध्ये शासनाने नमुद केल्यानुसार योग्य ती कार्यवाही करणेसाठी शासन निर्णयाची प्रत या सोबत पाठविण्यात येत आहे, त्यामधील निर्देशानुसार अटी/शर्तीची पुर्तता कारागृह स्तरावर करुन पात्र बंद्यांना राज्यमाफी देणेबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सोबतः- शासन निर्णयाची प्रत

VMadhav
5/6

(डॉ. विठ्ठल एन.जाधव)
विशेष पोलीस महानिरीक्षक (मु)
कारागृह व सुधारसेवा
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रति,

अधीक्षक,
मध्यवर्ती/ जिल्हा/खुले कारागृह(सर्व) स्वंतत्रपूर खुली वसाहत आटपाडी रत्नागिरी विशेष कारागृह

प्रतः- विशेष पोलीस महानिरीक्षक,(कारागृह) दक्षिण विभाग, भायखळा मुंबई-८ व कारागृह उपमहीानिरीक्षक (सर्व) यांना माहितीस्तव.

प्रतः-अवर सचिव,(श्री.संदीप काबळे) गृह विभाग, महराष्ट्र शासन तुरुंग-३ मंत्रालय मुंबई-३२ यंना माहितीस्तव.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या
जयंतीनिमित्त बंद्यांना राज्यमाफ़ी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण ०९१६/प्र.क्र.२५०/१६/तुरूंग-३

मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: ०३ जून, २०१७

प्रस्तावना -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त (समता वर्ष) राज्यातील विविध कारागृहांमध्ये शिक्षा भोगत असणा-या बंद्यांना शासनामार्फ़त राज्यमाफ़ी देण्याबाबत विनंती अर्ज शासनास करण्यात आले होते.सदर विनंती अर्जांस अनुसरून बंद्यांना राज्यमाफ़ी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त (समता वर्ष) याबाबत राज्य शासनास कार्यकारी अधिकार आहेत, अशा बाबीसंबंधातील कायद्याविरूद्ध गुन्हे केल्याबाबत महाराष्ट्र राज्यात शिक्षा झालेल्या ठराविक वर्गात येणा-या कैद्यांना राज्यमाफ़ी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार फ़ौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम-४३२ (१) अन्वये महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून शासन खाली नमूद केलेल्या वर्गात मोडणा-या बंद्यांना त्यांच्या शिक्षेत (दंडाची शिक्षा वगळून) निम्न नमूद केल्यानुसार राज्यमाफ़ी देण्याचा आदेश देत आहे-

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक १४.४.२०१६ रोजी करण्यात यावी.

बंद्यांच्या शिक्षेची वर्गवारी	
शिक्षा कालावधी	**राज्यमाफ़ीचे प्रमाण**
३ महिन्यांपर्यंत	७ दिवस
३ महिन्यांपेक्षा अधिक ते १२ महिन्यांपर्यंत	१५ दिवस
१ वर्षापेक्षा अधिक ते ५ वर्षांपर्यंत	२ महिने
५ वर्षांपेक्षा अधिक किंवा जन्मठेपेची शिक्षा असल्यास	३ महिने

सदर राज्य माफ़ी अंमलात आलेल्या दिवशी अधिकृतपणे अभिवचन/ संचित रजेवर असलेल्या बंद्यांना सदर शिक्षा माफ़ीचा लाभ देण्यात येईल. तसेच फ़ौजदारी दंड प्रक्रियेमध्ये (Criminal Procedure Code) दिनांक १८.१२.१९७८ रोजी अंतर्भूत करण्यात आलेल्या कलम- ४३३ (अ) अंतर्गत देहांत शासन ही एक शिक्षा असून सदर कलमान्वये जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली असल्यास किंवा देहांत शासनाची शिक्षा फ़ौजदारी दंड प्रक्रियेतील कलम- ४३३ अन्वये जन्मठेपेच्या शिक्षेत रूपांतरीत करण्यात आली असल्यास अशा बंद्यांना सदर शिक्षामाफ़ीचा प्रत्यक्ष फ़ायदा त्यांनी निव्वळ १४ वर्षांची कारागृहीन शिक्षा भोगल्यानंतरच देण्यात येईल.

सदर राज्य माफ़ी अंमलात आलेल्या दिवशी न्यायालयामार्फ़त मंजूर जामीनावर असणा-या बंद्यांना देखील सदर राज्य माफ़ीचा फ़ायदा देण्यात येईल.

निम्न नमूद वर्गातं मोडणा-या बंद्यांना परिच्छेद- २ मध्ये नमूद करण्यात आलेली शिक्षा माफ़ी देण्यात येऊ नये-

i. फ़ौजदारी दंड प्रक्रियेच्या (Criminal Procedure Code) कलम- १०६ ते ११० अंतर्गत (चॅप्टर केसेस) कारागृहात शिक्षा भोगत असलेले बंदी
ii. भारतीय दंड संहितेच्या (I.P.C.) कलम- १२१ ते १३० अंतर्गत (राज्यविरोधी कारवाईचा गुन्हा) शिक्षा भोगत असलेले बंदी
iii. केंद्रीय कायद्यांतर्गत शिक्षा झालेले बंदी
iv. दिवाणी कायद्यांतर्गत शिक्षा भोगत असलेले बंदी
v. किशोर सुधारालयातील मुले
vi. अनधिकृतपणे कारागृहाबाहेर असलेले शिक्षाधीन बंदी

सदर प्रकरणी विधि व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार फ़ौजदारी दंड संहिता, १९७३ मधील कलम-४३२(२) अंतर्गत शिक्षा माफ़ीसंबंधीची तरतूद विचारात घेऊन अपर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सूचना देण्यात येते की, त्यांनी सर्व कारागृह अधीक्षकांमार्फ़त प्रत्येक शिक्षाधीन बंद्याचे प्रकरणी सदर बंद्यास राज्यमाफ़ी देण्यात यावी किंवा कसे याबाबत बंद्यास शिक्षा देणा-या संबंधीत न्यायालयाकडून अभिप्राय प्राप्त करून घेऊन त्यानुसार प्रत्येक बंद्यास त्या अनुषंगाने उपरोक्त नमूद केल्यानुसार मिळणा-या राज्यमाफ़ीबाबतची नोंद माफ़ी रजिस्टरमध्ये घेण्याची सूचना सर्व कारागृह अधीक्षकांना द्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०६०३१६५५१२२३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandip Shamrao Kamble

Digitally signed by Sandip Shamrao Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d7be2b5d92ced254370f6b4a4542 6167ed60f51dcb34812d7d246c9a9c8557c, cn=Sandip Shamrao Kamble
Date: 2017.06.03 16:53:40 +05'30'

(संदीप कांबळे)
अवर सचिव, गृह विभाग

प्रत,

१. अपर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. विशेष पोलिस महानिरीक्षक, मुख्यालय, पुणे
३. विशेष पोलिस महानिरीक्षक, दक्षिण विभाग, भायखळा
४. सर्व कारागृह उपमहानिरीक्षक
५. सर्व कारागृह अधीक्षक.